सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गात पदोन्नतीने सुधारीत पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन आदेश क्रमांक: एमएफएस-२०१९/प्र.क्र.८५ / फ-८
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ ऑगस्ट २०१९.

पहा :- शासन आदेश, महसूल व वन विभाग क्र.एमएफएस-२०१९/प्र.क्र.-२७/ फ-८, दि.२७/०५/२०१९

शासन आदेश :-

शासन आदेश, संदर्भ क्र.१ दि.२७/०५/२०१९ अन्वये वन विभागातील, वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गातील ७२ अधिकाऱ्यांची सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गातील खुल्या प्रवर्गासाठी राखीव जागांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली आहे.

२. खाली तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेमध्ये अंशत: बदल करून त्यांच्या नावासमोर स्तंभ-४ मध्ये दर्शविल्यानुसार पदोन्नतीनंतर सुधारीत पदस्थापना देण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नांव	शासन आदेश दि.२७/०५/२०१९ अन्वये देण्यात आलेली पदस्थापना	पदोन्नतीने सुधारीत पदस्थापना	शेरा
१	२	३	४	५
१	श्री.के.वाय.शेख	सहायक वनसंरक्षक (मुल्यांकन) औरंगाबाद	सहायक वनसंरक्षक सामाजिक वनीकरण, नांदेड	रिक्त पदावर (विनंतीनुसार)

३. उपरोक्त अधिकाऱ्यांच्या सुधारीत पदस्थापनेमुळे रिक्त झालेल्या पदांवर अन्य अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. सदर नियुक्ती / पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यांना नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

५. संबंधित अधिकाऱ्याला शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित अधिकाऱ्याला मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

६. सदरहू सुधारीत पदस्थापनेच्या आदेशानुसार संबधित अधिकारी तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०८१४१५०२२१०११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec,
serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.08.14 15:15:30 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, म.रा., पुणे.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद
७. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण,औरंगाबाद
८. महालेखापाल,महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र नागपूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी औरंगाबाद / नांदेड
१०.मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
११.प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१२.संबंधित अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) , म.रा.नागपूर यांचे मार्फत.
१३.निवड नस्ती (फ-८ कार्यासन)महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२